कामगार कल्याण
जनसंपर्क विभाग

# e-Newsletter

सोलापूर
महानगरपालिका

Volume : X Issue : III Date : 16/03/2016

## पाणी हे जीवन आहे पाणी वाचवा





सोलापूर महानगरपालिकेच्या वतिने जल जागृती सप्ताहाचा शुभारंभ महापौर यांचे दालनात महापौर प्रा सुशीलाताई आबुटे यांचे शुभहस्ते जलपुजन व दिपप्रज्वलन करुन शुभारंभ करणेत आला .

यावेळी प्रास्तावीक उपअभियंता संजय धनशेटटी यांनी केले प्रास्तावीकेत दि १६ मार्च ते २२ मार्च हा जल जागृती सप्ताह म्हणुन संपुर्ण राज्यात साजर करणेत येत आहे. पाणी बचत करणेसंबंधी सर्व विभागीय कार्यालयाकडुन संबधित प्रभागाचे नगरसेवकांचे सहायाने प्रत्येक प्रभागात जल जागृती करणेत येणार आहे . महापौर प्रा सुशीलाताई आबुटे लहानांपासुन मोठयांपर्यत प्रत्येकाने पाण्याचा काटकसरीने वापर करावा पाण्याची बचत प्रत्येकाने करावे आपणास अवश्यक तेवढेच पाणी पिण्यासाठी ग्लासात घ्यावे वाया न जाईल याची दक्षता घ्यावी .

उपस्थीत असलेल्या सर्वाना पाणी वाचविणेची जल प्रतिज्ञा दिली प्रथम महापौर यांनी या प्रतिज्ञेचे वाचन केले तदनंतर सर्वानी त्यांचे पाठोपाठ प्रतिज्ञा वाचन केले.

याप्रसंगी उपमहापौर प्रविण डोंगरे, स्थायी समिती सभापती रियाज हुंडेकरी , उपआयुक्त श्रीकांत मायकलवार, सहा आयुक्त प्रदिप साठे , प्र सार्व आ अभियंता आर एन रेडडी , नगर अभियंता लक्ष्मण चलवादी ,उपभियंता संजय धनशेटटी , श्रीकांत डांगे , जनसंपर्क अधिकारी प्रविण दंतकाळे, विभागीय आलमेलकर एस ए , सांगलीकर , डी एस पवार , जे ए नाईकवाडी, मठपती एन एस, रेगळ एस सी अवेक्षक अविनाश कामत आदी उपस्थीत होते .

संपर्क : iwpro@solapurcorporation.org. Phone : 0217 - 2735280